# जनतेच्या अपेक्षांची पूर्तता करण्यात सरकार अपयशी

## पंतप्रधानांच्या बंधूंकडूनच घरचा अहेर

पीटीआय, नवी दिल्ली

**निवडणुकीपूर्वी दिलेल्या** आश्वासनांची पूर्तता करण्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार असमर्थ ठरले असल्याची टीका विरोधकांकडून होत असतानाच मंगळवारी मोदी यांना त्यांचे बंधू प्रल्हाद यांनीच घरचा अहेर दिला. जनतेच्या अपेक्षांची पूर्तता करण्यात सरकार अपयशी ठरले असून समस्या सोडविण्याची इच्छाशक्तीच सरकारमध्ये नाही, अशी तोफ प्रल्हाद मोदी यांनी डागली आहे.

अखिल भारतीय रास्त दर दुकान महासंघाच्या वतीने जंतरमंतर येथे आयोजित करण्यात आलेल्या निदर्शनांच्या वेळी प्रल्हाद मोदी यांनी वरील टीका केली. प्रल्हाद मोदी हे या महासंघाचे उपाध्यक्ष आहेत.

लोकसभेच्या निवडणुकीत भाजपला बहुमत मिळावे यासाठी तुम्ही अहोरात्र मेहनत घेतली. मात्र तरीही तुम्हाला जंतरमंतर येथे निदर्शने करण्यासाठी यावे लागत आहे. हे एनडीए सरकारचे अपयश आहे, असे प्रल्हाद मोदी यांनी म्हटले आहे.

आपल्या वक्तव्याकडे भावाने भावाविरोधात केलेले बंड अशा नजरेतून पाहण्यात येऊ नये. नरेंद्र मोदी यांच्याबद्दल आपल्याला आदर आहे. परंतु आपण एक व्यावसायिक असून आपल्या भावासमोर समस्या मांडण्यासाठी या मंचावर आलो आहोत, असेही प्रल्हाद मोदी यांनी स्पष्ट केले आहे.

भ्रष्टाचाराच्या प्रश्नावरून प्रल्हाद मोदी यांनी सरकारवर टीका केली. जवळपास सर्वच राष्ट्रीय पक्षांनी भ्रष्टाचाराला खतपाणी घातले. आता नरेंद्र मोदी सरकार भ्रष्टाचाराच्या विरोधात लढण्याचा संदेश देऊन सत्तेवर आले आहे त्यामुळे आम्हाला रस्त्यावर उतरणे भाग पडले आहे, असेही प्रल्हाद मोदी म्हणाले.

जनतेला भेडसावणाऱ्या समस्या सोडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला नाही तर उत्तर प्रदेश आणि बिहार विधानसभा निवडणुकांमध्ये भाजपला पराभव पत्करावा लागेल, असा इशाराही त्यांनी दिला. पक्षाने समस्यांकडे कानाडोळा केल्यास दिल्ली निवडणुकीत भाजपची जी अवस्था झाली तीच अवस्था उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये होईल, असेही प्रल्हाद मोदी म्हणाले.

## गोव्यातील खाणकामाची स्थगिती उठविण्याचा निर्णय

पीटीआय, नवी दिल्ली

**गोवा राज्यातील** खाणकामावरील स्थगिती उठविण्याचा निर्णय केंद्राने मंगळवारी घेतला. या निर्णयामुळे राज्यातील खाण उद्योगाचे काम तातडीने सुरू होईल, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. राज्याच्या खाण उद्योगात पर्यावरणात्मक अटींचे उल्लंघन होत असल्याचा ठपका ठेवत तत्कालीन पर्यावरणमंत्री जयंती नटराजन् यांनी सप्टेंबर २०१२ मध्ये सर्व खाणींचे काम स्थगित ठेवण्याचा आदेश दिला होता.

# राजकीय पक्ष आदेशांचे पालन करीत नाहीत

## माहिती आयोगाचीच कबुली

पीटीआय, नवी दिल्ली

**माहिती अधिकार** कायद्याच्या कार्यकक्षेत आणलेले राजकीय पक्ष आमच्या आदेशांची अंमलबजावणी करीत नाहीत, असे केंद्रीय माहिती आयोगाने म्हटले आहे. असे असले तरी त्यांनी मुख्य सार्वजनिक माहिती अधिकारी नेमलेले नसल्याने त्यांना दंड किंवा नुकसानभरपाई वसूल करण्यात आम्ही असमर्थ आहोत, अशी कबुली आयोगाने दिल्यामुळे राजकीय पक्षांना माहिती अधिकाराच्या कक्षेत आणल्याचा काहीच परिणाम झालेला नाही हे स्पष्ट झाले.

केंद्रीय माहिती आयोगाने म्हटले आहे की, सहा पक्षांना आदेशांचे उल्लंघन केल्याबद्दल दंड किंवा शिक्षा करण्यात आम्ही असमर्थ आहोत कारण त्यांनी केंद्रीय सार्वजनिक माहिती अधिकारी नेमलेले नाहीत. तसेच यापुढील कारवाई सरकार व न्यायालयांनी करायची आहे.

न्या. विजाई शर्मा, मंजुळा पराशर व शरद सभरवाल यांच्या पीठाने माहिती अधिकार कार्यकर्ते सुभाश अग्रवाल व असोसिएशन ऑफ डेमोक्रॅटिक रिफॉर्मच्या याचिकांवर हा निकाल दिला. भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, बसपा, माकपा, भाकपा यांनी माहिती अधिकार कायद्याचे पालन केलेले नाही असे याचिककर्त्यांचे म्हणणे होते. या तिघांनीही मुख्य माहिती आयुक्तपदासाठी अर्ज केला होता. मुख्य माहिती आयुक्तांची नेमणूक पंतप्रधान, विरोधी पक्षनेते व कॅबिनेट मंत्री यांची समिती करीत असते. आयोगाच्या आदेशातील बाबींचे पालन राजकीय पक्ष करीत नाहीत, कायदेशीर विचार करता राजकीय पक्षांना दंड किंवा नुकसानभरपाईचे आदेश देऊनही त्यांचे पालन होत नाही.

# काळा पैसा शोधण्यासंबंधी विधेयकास मंजुरी

पीटीआय, नवी दिल्ली



**परदेशात काळा** पैसा व बेकायदा मालमत्ता दडवून ठेवणाऱ्यांना १० वर्षांपर्यंत सक्तमजुरीची शिक्षा ठोठावण्याची तरतूद करणाऱ्या विधेयकास केंद्रीय मंत्रिमंडळाने मंगळवारी मंजुरी दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत यासंबंधी निर्णय झाला.

संबंधित विधेयकातील तरतुदींची घोषणा अर्थसंकल्पामध्ये करण्यात आली होती. त्यानुसार गुन्हेगारास निवाडा आयोगाकडे धाव घेता येणार नाही तसेच त्याची मालमत्ता आणि उत्पन्नावर ३०० टक्के दराने दंड ठोठावण्यात येणार आहे. परदेशातील मालमत्तेसंबंधी प्राप्तिकराच्या विवरण पत्रामध्ये योग्य ती माहिती न देणाऱ्यास तसेच ही माहिती अपुरी देणाऱ्यास सात वर्षांपर्यंत सक्तमजुरीची शिक्षा ठोठावण्याची तरतूदही या विधेयकात आहे.

# केजरीवाल, सिसोदिया, यादव अखेर न्यायालयात हजर

## फौजदारी स्वरूपाचा बदनामीचा खटला

पीटीआय, नवी दिल्ली

**दिल्लीचे मुख्यमंत्री** अरविंद केजरीवाल, उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया आणि बंडखोर नेते योगेंद्र यादव यांना फौजदारी स्वरूपाच्या बदनामीच्या खटल्यात मंगळवारी दिल्लीतील न्यायालयात हजर राहणे भाग पडले. यापूर्वी हे नेते न्यायालयात गैरहजर राहिले होते, तेव्हा सदर नेत्यांना कायद्याबद्दल आदर नाही, असा शेरा न्यायमूर्तींनी मारला होता.





केजरीवाल, सिसोदिया आणि यादव न्यायालयात का गैरहजर राहिले ते कळत नाही. त्यांना कायद्याबद्दल आदर नाही. एकही आरोपी न्यायालयात हजर नाही त्यामुळे या खटल्याची सुनावणी दुपारी दोन वाजता होईल, असे महानगर दंडाधिकारी मयूरी सिंह म्हणाल्या.

न्यायालयात गैरहजर राहण्याची सवलत देण्यात यावी, अशी या तिघांनी केलेली याचिका फेटाळून लावण्यात आली. त्यानंतर तिघेही न्यायालयात हजर राहिले तेव्हा दंडाधिकाऱ्यांनी या प्रकरणाची सुनावणी २ मे रोजी घेण्याचे निश्चित केले.

दिल्लीचे मुख्यमंत्रीच न्यायालयात हजर राहिल्याने न्यायालयात आणि संकुलात गर्दी जमली होती. त्यामुळे बघ्यांना न्यायालयातून बाहेर जाण्याचे आदेश महानगर दंडाधिकाऱ्यांना द्यावे लागले.

# जमीन अधिग्रहणाविरोधात विरोधकांची एकजूट

प्रतिनिधी, नवी दिल्ली

राष्ट्रीय जनता दल, संयुक्त जनता ... झाल्यास जमीन अधिग्रहण


### सूचना

**सूचना** देण्यात येते की, फिनोलेक्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड, या कंपनीच्या दिनांक १६/०३/२०१५ रोजी दुपारी ४.०० वाजता झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेत कंपनी कायदा १९५६ च्या कलम ३१ व तत्सम तरतुदी अंतर्गत व एम.सी.ए. परिपत्रक नंबर १८ दि. ११/०६/२०१४ नुसार सभासदांनी संमत केलेल्या विशेष ठरावानुसार **'फिनोलेक्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड'**चे रूपांतर **'फिनोलेक्स इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड'** करण्याचे ठरविले आहे.

तरी सदर रूपांतरणास जर कोणास विरोध/आक्षेप असल्यास त्यांनी त्यांचे आक्षेप प्रतिज्ञापत्रासह व इतर पुराव्यानिशी रजिस्ट्रार ऑफ कंपनीज्, पी.एम.टी. बिल्डिंग, ३ मजला, डेक्कन जिमखाना, पुणे ४११००४ या पत्त्यावर पाठवावे. तसेच त्याची प्रत कंपनीच्या

### जाहीर सूचना

जनतेस/ ग्राहकांना याद्वारे कळविण्यात येते की, दि टेलिकम्युनिकेशन्स (ब्रॉडकास्टिंग अँड केबल सर्व्हिसेस) इंटरकनेक्शन (डिजिटल अॅड्रेसेबल केबल टेलिव्हिजन सिस्टिम्स) रेग्युलेशन २०१२ या नियमातील खंड ६.५ नुसार **मेसर्स डेन मनोरंजन सॅटेलाईट प्रा. लि.** ५०५, ५ वा माळा, रेनबो प्लाझा, शिवार गार्डन, रहाटणी, पुणे, महाराष्ट्र ४११०१७ यांना दिले जाणारे पुढील दूरदर्शन वाहिन्यांचे सिग्नल्स **सबस्क्रिप्शन चार्जेस** त्यांनी भरलेले नसल्यामुळे २१ दिवसांनंतर खंडित केले जाणार आहेत- वाहिन्यांची नावे अशी- सुर्या म्युझिक, उदया मुव्हीज, सन लाईफ, किरण टीव्ही, जेमिनी टीव्ही, उदय न्यूज, कोछू टिव्ही, सन टीव्ही, सन न्यूज, उदय कॉमेडी, सन म्युझिक, आदित्य टिव्ही, छुट्टी टिव्ही, उदय टिव्ही, उदय म्युझिक, जेमिनी न्यूज, जेमिनी म्युझिक, जेमिनी लाईफ आणि सुर्या टिव्ही (एकत्रितपणे **एसडीएस** चॅनल्स), तसेच **मेसर्स साई व्हिजन केबल नेटवर्क**, शॉप नं. ८, आदित्य अपार्टमेंट्स, आनंदनगर, सिंहगड रोड, पुणे, महाराष्ट्र ४११०५१ यांनीसुद्धा **एस.एम.एस. रिपोर्ट सादर केले असल्याने आणि मे जीटीपीएल हाथवे प्रायव्हेट लिमिटेड**, २०२ दुसरा माळा, सहजानंद शॉपिंग

### गरवारे-वॉल रोप्स लिमिटेड

**नोंदणीकृत कार्यालय:** प्लॉट क्र. ११, ब्लॉक डी-१, एमआयडीसी, चिंचवड, पुणे - ४११ ०१९. **सीआयएन:** L25209MH1976PLC018939; **दूरध्वनी:** (०२०) ३०७८०००० ; **फॅक्स:** (०२०) ३०७८०३४९; **ईमेल:** secretarial@garwareropes.com; **वेबसाइट:** www.garwareropes.com

**सभासदांसाठी सूचना**

कंपनी कायदा, २०१३ चे कलम ११०, कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम २०१४ आणि कंपनी व स्टॉक इक्स्चेंज (इक्स्चेंजेस) ह्यांच्यामधील लिस्टिंग करारनाम्यानुसार सुचित करण्यात येत आहे की, कंपनीने शुक्रवार, दि. ६ मार्च २०१५ रोजी कंपनीच्या सभासदांच्या नोंदवहीमध्ये/डिपॉझिटरीच्या नोंदीमध्ये सभासद/लाभार्थी मालक म्हणून ज्यांची नावे आहेत, त्या सर्व सभासदांना दि. ६ फेब्रुवारी २०१५ ची टपाल मतदान नोटीस, त्यासंबंधीचे स्पष्टीकरणात्मक विवरण आणि प्री-पेड पोस्टेज इन्व्हलोप इत्यादी दस्तऐवज पाठविण्याची प्रक्रिया मंगळवार, दि. १७ मार्च २०१५ रोजी पूर्ण केलेली आहे. हे टपाल मतदान कंपनीच्या विद्यमान आर्टिकल्स ऑफ असोसिएशनच्या जागी नव्या आर्टिकल्स ऑफ असोसिएशनचा स्वीकार करण्यासाठी 'विशेष ठरावाद्वारे' संमती प्राप्त करण्यासाठी आहे. ज्या सभासदांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करायचे आहे त्यांना नियमानुसार सुविधा देण्यात आली आहे.

मतदान प्रक्रिया ही बुधवार, दि. १८ मार्च २०१५ रोजी सकाळी ९:०० वाजता सुरू होणार आहे. सभासदांनी, यथोचितरीत्या भरलेली आणि स्वाक्षरीकृत केलेली, टपाल मतपत्रिका ही गुरूवार, दि. १६ एप्रिल २०१५ रोजी संध्याकाळी ६:०० पूर्वी परिनिरीक्षकांकडे पोहोचेल अशा प्रकारे पाठविण्याची विनंती करण्यात येत आहे. परिनिरीक्षकांना गुरूवार, दि. १६ एप्रिल २०१५ रोजी संध्याकाळी ६:०० नंतर प्राप्त झालेली टपाल मतपत्रिका ग्राह्य धरण्यात येणार नाही.

ज्या सभासदांनी कंपनीकडे किंवा त्यांच्या संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपन्ट्सकडे आपले ईमेल आयडीज नोंदणीकृत केलेले आहेत, त्या सभासदांना गुरूवार, दि. १७ मार्च २०१५ रोजी ईमेलद्वारे टपाल मतदान दस्तऐवजही पाठविण्यात आलेले आहेत. सभासद हे प्रस्तावित ठरावावर इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीच्या (ई-मतदानाच्या) माध्यमातून आपले मतदान करू शकतात. ई-मतदान सुविधा ही बुधवार, दि. १८ मार्च २०१५ रोजी सकाळी ९:०० पासून https://www.e-voting@cdslindia.com ह्या लिंकवर उपलब्ध असेल आणि गुरूवार, दि. १६ एप्रिल २०१५ रोजी संध्याकाळी ६:०० पर्यंत सुरू राहील. गुरूवार, दि. १६ एप्रिल २०१५ रोजी संध्याकाळी ६:०० नंतर ई-मतदान उपलब्ध असणार नाही.

**केंद्र सरकारच्या** भूमी अधिग्रहण कायद्याविरोधात विरोधक एकजूट झाले आहेत. काँग्रेस व तृणमूल काँग्रेससह लहान-मोठ्या दहा पक्षांचे खासदार मंगळवारी विरोध मोर्चा काढून राष्ट्रपती प्रणब मुखर्जी यांना निवेदन दिले. संख्याबळाच्या दृष्टीने प्रमुख विरोधी पक्ष काँग्रेस असला तरी या मोर्चाचे नेतृत्व तृणमूल काँग्रेसने केले. भूमी अधिग्रहण

दल, भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे सदस्य मंगळवारी सायंकाळी पाच वाजता संसद परिसरातील महात्मा गांधींच्या पुतळ्याजवळ एकत्र जमले. तेथून मोर्चा काढून राष्ट्रपती भवनात विरोधी पक्षांच्या नेत्यांचे शिष्टमंडळ राष्ट्रपतींना भेटले. भूमी अधिग्रहण विधेयक लोकसभेत मंजूर करण्यात सरकार यशस्वी झाले असले तरी राज्यसभेत मात्र या विधेयकाचा मार्ग सोपा नाही.

विधेयक लटकणार. जमीन अधिग्रहणाविरोधात विरोधी पक्ष एकवटल्याने सत्ताधाऱ्यांमध्ये अस्वस्थता आहे.


नोंदणीकृत पत्त्यावर पाठवावी. सदर सूचनेच्या २१ दिवसानंतर रजिस्ट्रार ऑफ कंपनीज् नावनोंदणी सर्टिफिकेट वितरित करतील.

**फिनोलेक्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड करिता**

सही/-

**स्थळ** : पुणे

**दिनांक** : १७/०३/२०१५

**प्रल्हाद परसराम छाब्रिया**

संचालक

**टीप** : शब्दीय अर्थ व रचना यासाठी मूळ इंग्रजी प्रत ग्राह्य ठरेल. (डिन नंबर ०००११४३९)

**विजया बँक**
**VIJAYA BANK**

**कार्पोरेट बँकिंग शाखा :**
**विनायक निवास, १ ला मजला, १२०६/ए-३२,**
**शिरोळे रोड, संभाजी पार्क समोर, पुणे ४**

## ताबा सूचना

**[रुल - ८(१)] (स्थावर मालमत्तेसाठी)**

ज्याअर्थी, खाली सही करणार हे **विजया बँक,** यांचे अधिकृत अधिकारी असून त्यांना सिक्युरीटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२

सेंटर, स्वामी नारायण मंदिरासमोर, शाहीबाग, अहमदाबाद, गुजराथ- ३८०००४, जे पुणे क्षेत्रात कार्य करीत आहेत यांची **सबस्क्रिप्शन चार्जेसची थकबाकी भरली नसल्यामुळे व आमच्या सिग्नल्सचे पुनर्पक्षेपण (रिट्रान्समिटींग) नॉन डीएएस क्षेत्रात केल्यामुळे** २१ दिवसांनंतर त्यांची सेवा खंडीत केली जाणार आहे.

खालील संस्थेमार्फत प्रकाशित केली

**सन डिस्ट्रिब्युशन सर्व्हिसेस प्रा. लि.**

मुरासोली मारन टॉवर्स, ७३, एमआरसी नगर मेनरोड, एमआरसी नगर, चेन्नई- ६०००२८

टपाल मतपत्रिका प्राप्त न झालेले सभासद हे टपाल मतपत्रिकेची दुसरी प्रत प्राप्त करण्यासाठी कंपनीकडे अर्ज करू शकतात.

टपाल मतदानाची नोटीस आणि ई-मतदानासंबंधीची सूचना https://www.e-voting@cdslindia.com आणि http://www.garwareropes.com या वेबसाइट्सवर उपलब्ध आहेत. टपालाद्वारे किंवा ई-मतदानाद्वारे मतदान करण्याशी संबंधात तुम्हांला कोणतेही प्रश्न किंवा तक्रारी असल्यास, श्री. संतोष मोरे, लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्याशी, pune@linkintime.co.in या ईमेल-आयडीवर संपर्क साधावा.

गरवारे-वॉल रोप्स लिमिटेडसाठी

सही/-

दिनांक : १७ मार्च २०१५

एस. एच. बामने

स्थळ : पुणे

उपाध्यक्ष-कॉरपोरेट (सीएफओ)

**विजया बँक**

**अक्कलकोट शाखा :**